दरपत्रक मागविण्याच्या पत्राचा मसुदा

1519
जा.क्र./म.सं.कें./प्रशा./108/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दि. 11/05/२०२३

प्रति,

________________

**विषय :–वाकवली विभागातील नारळ व केळी बागेसाठी आवश्यक रासायनिक खतांचे दरपत्रक देणेबाबत...**

महोदय,

वरिल विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभागातील नारळ व केळी बागेसाठी खते खरेदि करावयाची आहेत.त्याचा तपशिल खालिलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | दर( प्रती बॅग ) |
|---|---|---|
| १ | युरीया. | |
| २ | सिंगल सुपर फॉस्फेट. | |
| ३ | म्युरेट ऑफ पोटॅश. | |

तरी वरीलप्रमाणे नमुद करण्यात आलेल्या खतांची आपली मोहोरबंद लखोटयातील दरपत्रके पोस्टाद्वारे दि. 28/04/23 पर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावे.या नंतर कार्यालयास प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.लिफाफ्यावर रासायनिक खतांचे दरपत्रक (वाकवली विभाग) असा स्पष्ट उल्लेख करावा.

**अटी व शर्ती**

१. दरपत्रक देताना लखोट्यावर रासायनिक खतांचे दरपत्रक (वाकवली विभाग)असे नमुद करावे.उपरोक्त नमूद केलेल्या दिनांका नंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

२.दरपत्रकामध्ये जीएसटी नंबर नमूद करावा.जीएसटी लागु होत नसल्यास तसे प्रमाणपत्र सादर व आधार कार्ड व पॅन कार्ड आवश्यक आहे.

३.सदर रासायनिक खते मध्यवर्ती संशोधन केंद्र,वाकवली अंतर्गत वाकवली विभागात कार्यालयास विहित मुदतीत पोहोच करणे आवश्यक आहे.

४.वरील रासायनिक खते खरेदि करणेबाबतची एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारणे/रद्द करणेचा तसेच खरेदि संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखुन ठेवित आहेत. टपाल खात्याचे विलंबास, हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

५.वरील रासायनिक खतांचे देयकामध्ये बॅंक खात्याची छायांकित प्रत,पॅनकार्ड,आधारकार्ड,जोडणे आवश्यक आहे.देयकाची अदायगी रक्कम बॅंक खात्यामध्ये करण्यात येईल.

६.विहीत मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. 24/4/2023 रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील.

७.टपाल खात्याचे विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

८.अधिकृत विक्रेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे तसेच संबधित कंपनीची अधिकृत दरसुची जोडावी.

९.दरपत्रकामध्ये संबंधीत सर्व करांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली, जि.रत्नागिरी

प्रत माहिती व पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी ...